आदित्यराज फार्मर्स प्रोड्युसर कं. लि.

दि. १०/०८/२०२२

# मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत कृषी व्यवसाय घटाकंतर्गत सहभाग घ्यावयाचा ठराव

**आज दि. १०/०८/२०२२ आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी, ता. गंगापुर , जि. औरंगाबाद. या कंपनीची बैठक मा. अध्यक्ष यांच्या निवास्थानी घेण्यात आली.**

❖ **विषय क्रं.१. कृषी विभागामार्फत मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत धान्य स्वच्छता, प्रतवारी, दालमिल व पशु खाद्य निर्मिती उद्योग या घटकाचा लाभ घेण्याबाबत.**

१. सदर बैठकीमध्ये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या धान्य स्वच्छता, प्रतवारी, दालमिल व पशु खाद्य निर्मिती उद्योग घटकाचा लाभ घेण्याचे ठरविण्यात आले. सदरील योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल व अर्ज दाखल करण्यास अध्यक्ष व सचिव यांनी पुढाकार घ्यावे व योग्य ती कार्यवाही करण्याचे ठरले.

यास सर्व संचालक गटातील सदस्यांनी सहमती दर्शवुन मान्यता दिली.

**सुचक :** सौ. उर्मिला केदार रहाणे

**अनुमोदक :** श्री. अरुण शेषराव जाधव

❖ **विषय क्रं २. कृषी विभागामार्फत मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत धान्य स्वच्छता, प्रतवारी, दालमिल व पशु खाद्य निर्मिती उद्योग या घटकाचा लाभ घेण्याकरीता स्वनिधी बँक लोन व अनुदान बाबत.**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या धान्य स्वच्छता, प्रतवारी, दालमिल व पशु खाद्य निर्मिती उद्योग घटकाचा लाभ उद्योग स्थापणेकरीता अंदाजे प्रकल्प मुल्य तिन

अध्यक्ष — सचिव

आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी मर्या.
खोजेवाडी फाटा, शहापूर बंजर, ता. गंगापूर
जि. औरंगाबाद



Scanned with CamScanner

कोटी पस्तीस लाख पर्यंत जाणे अपेक्षित आहे. त्याकरीता सविस्तर चर्चा करुण १०% (दहा टक्के)स्वनिधि ३० (तीस टक्के) बँक कर्ज व उर्वरित ६० % (साठ टक्के) अनुदान असे नियोजन करायचे ठरले.

आम्हाला कल्पना आहे की, सदर घटकांतर्गत प्रकल्पातुन लाभ घेण्यासाठी नोंदणाकृत बँकेचे / वित्तीय संस्थेचे कर्ज घेणे अनिवार्य आहे. सदर नोंदणाकृत बँक / वित्तीय संस्था स्वतंत्रपणे प्रकल्पाची तात्रिकदष्ट्या (technically feasible ) व आर्थिकदष्ट्या व्यवहार्यता (financially viable) तपासुन त्यांचे धोरणानुसार प्रस्ताव मंजून करतील. त्यासाठी सदर नोंदणाकृत बँक / वित्तीय संस्थेशी तसेच प्रकल्प अधिकारी ( उपविभागीय कृषी अधिकारी /प्रकल्प संचालक आत्मा ह्यांच्याशी आवश्यक ) त्रिपक्षीय करारनामा करण्यास आम्ही तयार आहोत. शदर करारनाम्यात प्रकल्पाच्या प्राण, आर्थक, पर्यावरणीय तसेच सामाजिक आराखड्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याचा उल्लेख असेल तसेच जागतिक बँकेच्या लाचलुचपत प्रतिबंध मार्गदर्शक सुचनांचा पालन करण्याचा उल्लेख असेल.

आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. मध्ये सहभागी नोंदणाकृत शेतकरी सभासदांच्या स्वनिधीबाबत एकत्रित ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आलेला असून सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये जोडलेला आहे. त्या अन्वये आम्ही रु. ३८ लक्ष किंवा ४५ लक्ष आवश्यकतेनुसार यापैकी एक इतका स्वनिधी जमा करणार आहोत

२. सदर घटकासाठी आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. या गटाची निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार तसेच प्रकल्प अधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखेखाली काम पुर्ण केल्यानंतरच अनुदान देय राहील. तसेच सदरचे काम विहीत मुदतीत व मार्गदर्शक सुचनेनुसार पुर्ण न केल्यास अनुदान मिळणार नाही, याची आम्हा जाणीव आहे.

३. आम्ही सदर प्रकल्पाच्या संकेतस्थळावरील प्रापण पुस्तकेची प्रत प्राप्त करुन घेतली असून त्याचे वाचन केले आहे. त्यानुसार नियोजित प्रकल्पातील प्रापण विषयक कार्यवाही पारदर्शपणे व निकोप पध्दतीने राबविण्यास आम्ही कटीवध्द आहोत. सदर प्रापण विषयक प्राशियेतील प्रापण समिती सदस्य असणारे पदाधिकारी / सदस्यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

अध्यक्ष सचिव
आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी मर्या.
खोजेवाडी फाटा, शहापूर बंजर, ता. गंगापूर
जि. औरंगाबाद

आदित्यराज फार्मर्स प्रोड्युसर कं. लि.

४. जागतिक बँकेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन सामाजिक न्याय सुरक्षा व पर्यावरणीय तपासणी सुचनेनुसार प्रकल्पाची अमलबजावणी पुर्ण करण्याची जबाबदारी आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी ता. गंगापुर, जि. औरंगाबाद या गटाची राहील.

५. प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार संरक्षित क्षेत्राची सूची तसेच वृक्ष छाटणी संदर्भात राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचा आम्ही काटेकोरपणे अवलंब करीत आहोत.

६. आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी ता. गंगापुर, जि. औरंगाबाद बांधकाम प्रस्तावासाठी लागू असलेल्या सदर प्रकल्पासाठी उपलब्ध जमिनीचा २९ वर्षे भाडेतत्वाचा नोंदणाकृत करारनामा सर्वानुमते करण्यात आला असून / करण्यात येणार असून त्यास प्रकल्पाला वापरासाठी परवानगी असले बाबतचे प्रमाणपत्र सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये जोडलेले आहे / जोडणार आहे.

७. सदर लाभ घेत असतांना व त्यानंतर गैरव्यवहार झाल्याचे आढळुन आल्यास अथवा लाभांशकत बाबीचा गैरवापर झाल्याचे सिध्द झाल्यास संबंधित घटकासाठी मिळालेले अनुदान सव्याज वसूल केले जाईल. याची आम्हाला स्पष्ट जाणीव आहे.

८. प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तिना प्रकल्प व अनुषंगिक बाबी तपासणीसाठी आमची संमती राहिल, तसेच त्यांना कामासाठी सहयोग करण्यात येईल.

९. आम्ही प्रकल्पाची मालमत्ता पुर्णपणे किंवा अंशत: हस्तांतरित करणार नाही किंवा त्यांची विक्री करणार नाही, तसेच अनुदान वितरीत झाल्यानंतर कमीत कमी पाच वर्षे हा प्रकल्प सुरु ठेवण्याची हमी देतो.

१०. आम्ही सदर घटकाच्या निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार तसेच प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर कृषी व्यवसाय विषयक घटकाच्या अंमलबजावणीची जबाबदारी सर्वस्वी आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. या कंपणीची राहील.

११. तसेच आज दि. १०/०८/२०२२ रोजी झालेल्या गटाच्या या बैठकीमध्ये प्रापण समिती मध्ये गटातील सदस्यांची निवड व त्या प्रापण समितीच्या अध्यक्षाची निवड करण्याचा ठराव घेण्यात आला. प्रापण समितीमध्ये

अध्यक्ष सचिव
आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी मर्या.
शहापूर बंजर, ता. गंगापूर

खालील ५ सदस्यांची निवड करण्यात आली. व त्या खरिदी समितीचे अध्यक्ष, गटाचे सचिव श्री. राजु रामकिसन रावते यांची निवड करण्याचा ठराव श्री. तुशार मधुकर निमोणे यांनी सुचविले व त्यास श्री. ज्ञानेश्वर गोरखनाथ गोल्हार अनुमोदन केले.

वरिल ठराव गटातील संचालक मंडळ व इतर सदस्यांनी ठराव सर्वानुमते मंजुर केला.

**सुचक :** श्री. अरुण शेशराव जाधव
**अनुमोदक :** श्री. मछिंद्र आसाराम कांबळे

**प्रापण विषयक समितीचा तपशील**

| अ. क्र. | नाव | पत्ता | पद | सही |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सचिदानंद सोमिनाथ रहाणे | गंगापुर | अध्यक्ष | |
| २ | श्री. राजु रामकिसन रावते | गंगापुर | सचिव | राजु रावते |
| ३ | सौ. उर्मिला केदार रहाणे | गंगापुर | उपाध्यक्ष | |
| ४ | श्री. अमोल लक्ष्मण चोथरे | कन्नड | ख. स. सदस्य | |
| ५ | श्री. तुषार मधुकर निमोणे | गंगापुर | ख. स. सदस्य | |

राजु रावते

अध्यक्ष सचिव

आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी मर्या.
खोजेवाडी फाटा, शहापूर बंजर, ता गंगापूर
जि औरंगाबाद



Scanned with CamScanner

## संचालक मंडळ / सभासद यादी

| अ. क्र. | नाव | पत्ता | पद | सही |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सचिदानंद सोमिनाथ रहाणे | गंगापुर | अध्यक्ष | [signature] |
| २ | श्री. राजु रामकिसन रावते | गंगापुर | सचिव | राजु रावते |
| ३ | सौ. उर्मिला केदार रहाणे | गंगापुर | उपाध्यक्ष | [signature] |
| ४ | श्री. अमोल लक्ष्मण चोथरे | कन्नड | सदस्य | [signature] |
| ५ | श्री. तुषार मधुकर निमोणे | गंगापुर | सदस्य | [signature] |
| ६ | श्री.सुभाष त्र्यंबक राहाणे | गंगापुर | सदस्य | [signature] |
| ७ | श्री. केदार सोमिनाथ राहाणे | गंगापुर | सदस्य | [signature] |
| ८ | श्री. ज्ञानेश्वर गोरखनाथ गोल्हार | औरंगाबाद | सदस्य | [signature] |
| ९ | श्री. अरुण शेषराव जाधव | गंगापुर | सदस्य | [signature] |
| १० | श्री. मच्छिंद्र आसाराम कांबळे | गंगापुर | सदस्य | [signature] |

[signature] अध्यक्ष — राजु रावते सचिव

आदित्यराज शेतकरी उत्पादक कंपनी मर्या.
...टी फाटा, शहापूर बंजर, ता. गंगापूर